**<u>सं.फौ.ख.क्र.१/२०१८</u>**
मनोज शिंदे वि. सक्षम बिल्डर

**<u>निशाणी क्र.६४</u>**

**<u>फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. ३ –</u>**

मी शपथेवर कथन करतो की,

नाव – उमेश सुरेश कटकधोंड

वय –४०, धंदा – नोकरी

हल्ली. रा. सुरत, राज्य, गुजरात,

मुळ पत्ता. पुणे.

**फिर्यादी साक्षीदाराचा शपथेवर सरतपास श्री. आर. वाय. कदम वकील यांच्यामार्फत :–**

मी फिर्यादीस ओळखतो. तो माझ्या पत्नीचा भाऊ आहे. फिर्यादीने माझ्याकडे जुन २०१७ मध्ये रक्कम रुपये ४ लाखाची मागणी केली होती. फिर्यादीस घर घेण्याकरीता रकमेची आवशक्ता होती. फिर्यादीस जाधववाडी फलटण येथे घर घेणे होते. फिर्यादीस रक्कम रुपये ४ लाख धनादेशाद्वारे दिले. फिर्यादीने मी दिलेला धनादेश हा सक्षम बील्डर ॲन्ड डेव्हलपरस् यांना दिला. मी दिलेला धनादेश हा स्टेट बँक ऑफ इंडीया शाखा दापोडी पुणे येथील होता. सदरचा धनादेश वटला होता व रक्कम रुपये ४ लाख सक्षम बिल्डरने घेतली होती. मला सक्षम बिल्डरने रक्कम रुपये ४ लाख पुन्हा माघारी दिले नाही व ते फिर्यादी मनोज महादेव शिंदे यांनी मला परत दिले. मी धनादेश सक्षम बिल्डरच्या नावाने मनोज शिंदेच्या ताब्यात दिला होता. मला त्यावेळी फिर्यादीने सदरचा चेक बिल्डरला देणार असल्याचे सांगितले होते व त्याप्रमाणे त्याने तो सक्षम बिल्डरला दिला. मी सक्षम बिल्डरचा मालक नितीन भोसले यास ओळखतो. मी फिर्यादीस सदरचे पैसे मदत म्हणून परत देण्याच्या बोलीवर दिले होते.

<u>आरोपी हजर.</u>

**फिर्यादी साक्षीदाराचा उलटतपास आरोपीतर्फे श्री. व्ही. डी. कदम वकील यांच्यामार्फत –**

मी सन २०१७ मध्ये सुरत येथे नोकरीस होतो. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी हा माझ्या पत्नीचा भाऊ आहे. मला फिर्यादीने रक्कम मागीतली त्यावेळी फ्लॅट खरेदी करावयाचा आहे असे सांगितले होते. फिर्यादीने त्या अनुशंगाने साठेखत केले किंवा कसे याबाबत मला काही

सांगितले नव्हते तसेच मी देखील त्या अनुशंगाने फिर्यादीकडे चौकशी केली नव्हती. माझ्या म्हणण्याप्रमाणे रक्कम रुपये ४ लाख हे जुन २०१७ मध्ये मागणी केली होती. मी दिनांक १२/०६/२०१७ चा धनादेश दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी धनादेश फिर्यादी मनोजच्या नावे दिला.

हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी व्याजाने रक्कम देण्याचा व्यवसाय करतो. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीस ३ टक्के व्याजाने रक्कम दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीस रकमेची गरज असल्याने त्याने फिर्यादी मनोजकडे व्याजाने रक्कम मागितली व मनोजचे सांगण्याप्रमाणे मी रक्कम रुपये ४ लाख व्याजाने आरोपीस दिले. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत व्याजाचे व्यवहारास हमी म्हणून फिर्यादीने प्रस्तुत प्रकरणातील धनादेश आरोपीस दिला होता.

हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १२/०८/२०१७ रोजी आरोपीने त्याच्या इंडसंन्ड बँक खात्यातुन माझ्या स्टेट बँक खात्यात व्याजाची रक्कम म्हणून रुपये १२,०००/– पाठविले. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १५/०९/२०१७ रोजी आरोपीने त्याच्या इंडसंन्ड बँक खात्यातुन माझ्या स्टेट बँक खात्यात व्याजाची रक्कम म्हणून रुपये १०,०००/– पाठविले. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर उर्वरीत पैसे मनोजने घेतलेल्या फ्लॅटच्या कामी जमा करण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीस रक्कम रुपये ४ लाख घर घेण्याकरीता दिल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी माझ्या सरतपासात सर्व खोटी कथने करीत आहे व आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

**(व्ही. एस. वाघ)**
न्याय दंडाधिकारी प्रथम श्रेणी,
फलटण, जि. सातारा.

ठिकाण : फलटण
दिनांक ०५/०१/२०२६